# वेतन आणि संपत्ती विषमता: एक संशोधनात्मक अभ्यास व प्रश्न.

# Wage and Wealth Inequality

प्रा. प्रणाली आर. भरतकर

विभाग - अर्थशास्त्र

मारिया आर्ट्स अँड सायन्स कॉलेज,देवळी.

जिल्हा वर्धा

email:- bharatkarpranali@gmail.com

**प्रस्तावना**- आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उत्पन्न आणि संपत्तीचे समान वितरण होणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात आर्थिक वाढीचा लाभ समाजातील सर्व घटकांना समान प्रमाणात मिळत नाही. परिणामी वेतन (income) आणि संपत्ती (wealth) यामध्ये विषमता वाढतांना बघायला मिळते. ही विषमता केवळ आर्थिकच नाही तर शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय स्वरूपाची ही आहे. त्यामुळे वेतन आणि संपत्ती विषमता हा विषय अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि सार्वजनिक धोरण या सर्व क्षेत्रांसाठी महत्त्वाचा ठरताना दिसतो. आजच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीत वेतनातील असमानता संपत्तीचे केंद्रीकरण आणि आर्थिक विषमता हे गंभीर सामाजिक प्रश्न आहे. वेतनाच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करतो शिक्षण, आरोग्य आणि कुटुंबाच्या विकासासाठी खर्च करते .दुसरीकडे बचत, योग्य नियोजन आणि गुंतवणूक यांच्या साह्याने वेतनातून संपत्तीची निर्मिती होते. त्यामुळे वेतन आणि संपत्ती यांचा परस्पर संबंध अतिशय जवळचा विषय आहे. वेतन आणि संपत्ती हे मानवी जीवनातील महत्त्वाचे दोन पैलू आहे.

## संशोधनाची गरज

वाढती वेतन व संपत्ती विषमता सामाजिक असमतोल, गरिबी बेरोजगारी आणि संधीच्या असमानतेला कारणीभूत ठरते. उच्च उत्पन्न गटाकडे संपत्तीचे केंद्रीकरण होत असताना निम्न व मध्यम उत्पन्न गट आर्थिकदृष्ट्या अधिक असुरक्षित बनत जात आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ही समस्या खूप जास्त प्रमाणात असल्याने तिचा जास्त खोलवर अभ्यास करणे गरजेचे आहे. या संशोधनातून वेतन आणि संपत्तीची विषमतेची परिणाम कारणे व उपाय समजून घेता येईल.

## संशोधनाची उद्दिष्टे

१) वेतन आणि संपत्ती विषमतेचे स्वरूप व पातळी अभ्यासणे.

२) वेतन आणि संपत्ती विषमतेची प्रमुख कारणे शोधणे.

३) विषमतेचे सामाजिक व आर्थिक परिणाम स्पष्ट करणे, विषमता कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

४) सरकारी धोरणांच्या विषमतेवर होणारा परिणाम.

५) जीवनावर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी रोजगार शोधणे सुधारण्यासाठी दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाय शोधण्यासाठी,

६) बचत व गुंतवणूक पद्धती समजून घेण्यासाठी शासनाच्या योजना व धोरणांचे मूल्यमापन करण्यासाठी भविष्यातील आर्थिक धोके कशा पद्धतीत निर्माण होतात ते ओळखण्यासाठी, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

**संशोधन पद्धती**

वरील संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचे आहे संशोधन प्रामुख्याने दुय्यम माहिती वर आधारित आहे. NSSO, PLFS, WORLD EQUALITY DATABASE, RBI आणि जागतिक बँकेचे अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, सरासरी, Gini गुणांक आणि लॉरेन्स वक्र यासारख्या सांख्यिकी साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. तुलनात्मक अभ्यास पद्धती, प्रकरण अभ्यास, पुस्तके व संदर्भ ग्रंथ आकृती

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)




स्त्रोत- आकृती 1.1 वेतन आणि संपत्ती विषमता

**वेतन आणि संपत्ती विषमतेची कारणे**

शिक्षणातील असमानता - उच्च शिक्षण आणि कौशल्य असलेल्या व्यक्तींना अधिक वेतन मिळते.

अनौपचारिक रोजगार - कमी वेतन, सामाजिक सुरक्षा अभाव.

वारसा व मालमत्ता - संपत्ती पिढ्याणु पिढ्या काही परिवारास जमा राहते.

कौशल्य असलेल्या व्यक्तींना अधिक वेतन मिळते.

तंत्रज्ञान व जागतिकीकरण - कुशल कामगारांना फायदा , अकुशल कामगारांना तोटा.

कर व आर्थिक धोरणे - अप्रभावी पुनर्वितरण धोरण.

**वेतन व संपत्ती विषमतेचे परिणाम**

गरीबी व बेरोजगारीत वाढ सामाजिक अस्थिरता व असंतोष सामाजिक गतिशीलतेत घट, सरकारी धोरणे व त्यांचा प्रभाव शिक्षण व आरोग्यावर नकारात्मक परिणाम भारत सरकारने किमान वेतन मनरेगा सामाजिक सुरक्षा योजना थेट लाभ हस्तांतरण (DBT) यासारख्या उपाय व रोजगार कौशल्य विकास शासन व धोरणात्मक, सामाजिक व

जनजागृती आर्थिक साक्षरता अभियान, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग या अनेक उपाययोजना राबवल्या आहे. मात्र या धोरणांची अंमलबजावणी प्रभावी न झाल्यास विषमता विचारात घेतल्या प्रमाणे कमी होत नाही. त्यामुळे धोरणांची परिणामकारकता वाढवणे गरजेचे आहे.

वेतन आणि संपत्तीतील तफावत कमी होऊन समाजात आर्थिक समता व स्थैर्य प्रस्थापित करता येईल.

**निष्कर्ष**

१) संपत्ती व वेतन हा कोणत्याही समाजाच्या आर्थिक व सामाजिक रचनेचा कणा आहे. त्याचा परिणाम नुकताच आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता सामाजिक, नैतिक आणि राजकीय क्षेत्रात दिसून येते.

२) उत्पन्न आणि संपत्ती काही थोड्या थोडक्यात व्यक्ती किंवा समूहाच्या हातात केंद्रित झाल्यामुळे समाजातील मोठ्या गटात मूलभूत गरजा गुणवत्ता पूर्ण शिक्षण असते.

३) आरोग्य सेवा आणि समाज मान्य जीवनमान मिळणे कठीण असते. वेतन विषमतेमुळे श्रमिकांची श्रममुल्य कमी लेखले जाते,तर संपत्ती विषमतेमुळे वर्षानुवर्ष चालणारी आर्थिक परिस्थिती जास्त वाढत जाते.

४) ही परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यास आर्थिक वाढ असमतोल आणि अव्यवस्थित कमी कालावधीसाठी ठरू शकते.

५) सर्व समावेशक आणि न्याय विकासासाठी शासनाने प्रभावी वेतन धोरण राबविणे, यासोबत गुणवत्ता, पूर्ण आरोग्य, सार्वजनिक शिक्षण, रोजगार निर्मिती व कौशल्य विकास यांच्या विचार केल्यास आर्थिक संधीचे सारखे वाटप शक्य होते.

६) वेतनाने विषमता जर कमी करणे, हे आर्थिक धोरणाची उद्दिष्टे नाही तर

७) सामाजिक न्याय समता आणि लोकशाही मूल्याचे काळजी करणे हे महत्त्वाचे आहे.

८) वेतन आणि विषमता ही बहुआयामी समस्या आहे. तिची सखोल शिक्षण रोजगार रचना तंत्रज्ञान आणि धोरणामध्ये सामावलेले आहे.

९) प्रगतिशील कर रचना आणि प्रभावी सामाजिक सुरक्षा धोरण गरजेचे आहे. संतुलित आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी वेतन व संपत्ती विषमतेवर नियंत्रण असणे खूप गरजेचे असते.

**संदर्भ**

१) जागतिक असमानता अहवाल 2026 नुसार भारत जागतिक सर्वाधिक असमान देशांपैकी एक आहे.

२) थॉमस पिकेटी (2013)-'capital in the 21st century.'-editions the seuil Harvard University press.

३) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम मानवी विकास अहवाल 2024 -2026 नुसार,

४) भारत सरकार भारताची आर्थिक सर्वेक्षण मुख्य निष्कर्ष (उदा. 2024-25 सर्वेक्षणानुसार)

५) नियोजन आयोग / निती आयोग भारतातील गरिबी व असमानतेवरील अहवाल 2014.

६) आंतरराष्ट्रीय कामगार  संघटना (ILO) च्या 'ग्लोबल व्हेज अहवाल'.

७) अमर्त्य सेन (1999)'डेव्हलपमेंट आज फ्रीडम अल्फ्रेड ए. प्रकाशन.

८)WWW.makeinindia.com

९) https://data.gov.in

१०) Gini index.